**प्रेसनोट** दिनांक ०८/०७/२०२०

**<u>आरोपी उत्तम दत्तात्रय बोयणे</u> वय ४८ वर्षे, पद तलाठी, वर्ग ३, नेमणुक सजा हरंगुळ (बु.) जि. लातूर <u>यांनी व त्यांचे खाजगी मदतनीस यांनी तकारदार यांना २०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १०००/— रूपये सदर रक्कम स्विकारल्याने अटक करून गुन्हा दाखल.</u>**

यातील तकारदार याने दिनांक ०८/०७/२०२० रोजी तकारदार यांच्या आईच्या नावे हरंगुळ (बु.) गट नंबर १०६ मध्ये खरेदी केलेल्या प्लॉटची सातबा—यावर नोंद करणेसाठी तलाठी उत्तम बोयणे यांचे मदतनीस खाजगी इसम यांनी २,०००/— रुपये लाचेची मागणी करत असल्या बाबतची तकार दिनांक ०३/०६/२०२० रोजी प्राप्त झाली होती.

तकारदार यांनी वर नमुद दिलेल्या तकारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक ०४/०६/२०२० व ०५/०६/२०२० रोजी तलाठी यांचे खोरे गल्लीतील खाजगी कार्यालयात तकारदारास पाठवुन लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान तलाठी यांचे खाजगी मदतनीस विश्वनाथ शिवबसअप्पा पत्रिके यांनी तकारदार यांच्या वर नमुद कामासाठी पंचासमक्ष २०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे व तलाठी यांचे दुसरे खाजगी मदतनीस राकेश मारोती राठोड यांनी सदरची लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ०८/०७/२०२० रोजी तकारदार यांना तलाठी यांचे खोरे गल्लीतील खाजगी कार्यालयात लाचेची रक्कम देण्यासाठी पाठविले असता १२:५२ वाजता तलाठी उत्तम दत्तात्रय बोयणे यांनी १०००/— रूपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली आहे. म्हणुन तलाठी व त्याचे दोन्ही खाजगी मदतनीस यांना ताब्यात घेण्यात आले.

म्हणून त्याचेविरूध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर लातूर येथे कलम ७, ७अ, १२, ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, आटरगे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, मपोशि रुपाली भोसले, पोकॉ/संदीप जाधव, दिपक कलवले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

१) मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड :— मोबाईलकमांक ८८८८८४१९६५
२) माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक :— मोबाईल कमांक ९९२३६६६६४४
३) कुमारदराडेपोलीसनिरीक्षक :— मोबाईल कमांक ९६५७७०९८४१
४) बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक :— मोबाईल कमांक ९०६७२६६२६४
५) टोल फ्री हेल्पलाईन कमांक :— १०६४
६) कार्यालयाचा फोन कमांक :— ०२३८२—२४२६७४
७) Website :— www.acbmaharashtra.gov.in
८) Mobile App :— www.acbmaharashtra.net
९) Facebook Page :— www.facebook.com/MaharashtraACB

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर